# रंगरावदादांचे कार्य प्रेरणादायी

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील : पुतळा अनावरण, ग्रंथालय नामकरण कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : रंगरावदादा पाटील यांनी स्वराज्य चळवळीत वाटा उचलताना त्यांनी केलेल्या त्यागाला तोड नाही. त्यांच्या देशप्रेमाची चेतना नव्या पिढीला मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी आज येथे केले. ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयामध्ये क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्या पुतळा अनावरण समारंभात आणि महाविद्यालयाच्या ग्रंथालय नामकरण समारंभात ते बोलत होते. डॉ. पाटील यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले.

प्रा. डॉ. पाटील म्हणाले, "क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या हाताला जी नररत्ने लागली, त्यामध्ये रंगरावदादा, नागनाथ अण्णा, जी. डी. लाड यांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. रंगरावदादा पाटील प्राणाची बाजी लावून स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरले. स्वतःच्या खांद्यावर चळवळीची धुरा घेतली. सभेमध्ये पहाडी आवाज, आवेश, जरब, दुसऱ्याला घायाळ करण्याचे धैर्य ही त्यांची खासियत होती."

खासदार संजय पाटील म्हणाले, "डॉ. व्ही. टी. पाटील यांनी बहुजनांच्या मुलींसाठी ही संस्था उभारली. आज विनाअनुदान शिक्षण संस्था निघत आहेत. त्यामुळे देशहित, समाजहित, राष्ट्रहित या कल्पना मागे पडू लागल्या आहेत. समाजाचे शोषण होत आहे. रंगरावदादांनी आयुष्यभर देशहित, राष्ट्रहित आणि गर्दीतला माणूस शोधला."

आमदार शिवाजीराव नाईक म्हणाले, "रंगरावदादांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही घडलो. त्यांची स्मृती, क्रांतिकारक इतिहास समाजासमोर राहावा या हेतूने हा पुतळा त्यांचे चिरंतन स्मारक ठरेल. गरिबांना विसरायचे नाही, हा त्यांचा महान विचार होता." अण्णा डांगे म्हणाले, "स्वराज्याचे सुराज्य कसे होईल, गरिबांचे राज्य कसे येईल, यासाठी रंगरावदादांच्या भाषणात घणाघात होत असे."

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. तेजस्विनी मुडेकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. सुजय पाटील यांनी करून दिला. आभार प्रा. जयसिंगराव सावंत यांनी मानले. कार्यक्रमाला माजी आमदार बाबूराव धारवाडे, डॉ. एस. एन. पवार, विजयकुमार पाटील, ॲड. प्रकाश हिलगे, प्राजक्त पाटील, माजी आमदार संपतराव पवार-पाटील, तसेच अरुण लाड आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : रंगरावदादा पाटील यांच्या पुतळा अनावरण प्रसंगी प्रा. डॉ. एन. डी. पाटील. बाबूराव धारवाडे, शिवाजीराव नाईक, अण्णासाहेब डांगे, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील, विजयकुमार पाटील, सुप्रिया मोहिते आदी.

### त्यांनी पुत्र गमावला...

**१९७२ च्या दुष्काळात सरकारविरुद्ध संघर्ष पुकारावा लागला. जनतेसाठी लढताना त्यांना स्वतःचा पुत्र राजेंद्रला गमवावे लागले. पोलिसांनी केलेला हा गोळीबार अतिरेकी होता, हे सिद्ध झाले. त्यांनी घडवलेला सामाजिक इतिहास विसरणे शक्य नाही असे, प्रा. एन. डी. पाटील यांनी सांगितले.**

Scanned by CamScanner